# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागा अंतर्गत कला क्रीडा महोत्सव 2025 चे आयोजन**

दिनांक 04 जानेवारी व दिनांक 05 जानेवारी 2025 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागा अंतर्गत कला क्रीडा महोत्सव 2025 चे आयोजन नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथे करण्यात आले आहे. सदर कला-क्रीडा महोत्सव 2025 चा शुभारंभ मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

मा. आयुक्त यांनी पालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये खेळाचे महत्त्व वाढावे, त्यांचा शारीरिक व सर्वांगीण विकास व्हावा यासाठी या कला क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले आहे. 04 जानेवारी व 05 जानेवारी 2025 या दोन दिवसात नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथे सकाळी 10.00 ते दुपारी 06.00 वाजेपर्यंत विविध मैदानी खेळांच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. दिनांक 04 जानेवारी रोजी कबड्डी, लंगडी व रस्सीखेच आणि दिनांक 05 जानेवारी रोजी 100 मी., 200 मी. धावणे, खो-खो व रस्सीखेच या खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कला-क्रीडा महोत्सव 2025 मध्ये पालिका अधिकाऱ्यांनी उपस्थित राहुन खेळाडूंचे मनोधैर्य वाढविणे, त्यांची पालक म्हणुन काळजी घेणे अपेक्षित आहे यासाठी दोन दिवसाकरिता अधिकाऱ्यांना क्रीडा महोत्सवात उपस्थित राहावे असे मा. आयुक्त यांनी सर्व अधिकाऱ्यांना सूचित केले आहे. सदर कला-क्रीडा महोत्सवात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्या असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांनी केले आहे.

